# मूल्याधिष्ठित राजकारण

**मारुती अवदी**
**(अनुवाद-प्रल्हाद बढेर)**

आपण नेहमी मूल्याधिष्ठीत राजकारणासंबंधी ऐकतो. मूल्याधिष्ठित राजकारण म्हणजे काय? त्याची आवश्यकता कोणती? या विषयाचा विविध बाजूंची चिकित्सा करण्याचा हा प्रयत्न आहे. मल्याधिष्ठित राजकारण म्हणजे नैतिन मूल्यावर आधारलेले राजकारण.

नैतिकता म्हणजे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुध्दा माणसाच्या वागणुकीवर नियंत्रण ठेवणारी मूल्ये. माणूस आणि पशू यांच्यातला फरक फक्त नीतिमत्ता दाखवते. कुठलाही धर्म आणि कोणताही धर्मगुरु नैतिक मूल्यांचा फतवा काढू शकत नाही. कारण जगातील सर्व देशांमध्ये संघटित धर्म आणि धर्मगुरु हे समाजाच्या आर्थिक शोषण करणाऱ्यांच्या हातातील बाहुली आहेत. खरी नैतिक मूल्ये धर्मातीत आहेत. नीतिमान माणूस देवाचा भक्त असतो. पण त्याचा परमेश्वर हा कुठल्याही चर्च मशीद किंवा देवळातला कैदी नसतो. त्याला देवाजवळ आण्यात कुठल्याही प्रेषिताची किंवा मध्यस्थाची बिलकुल गरज नसते. नैतिक मूल्यांवर आधारलेल्या आचरणाने तो परमेश्वराची पूजा करतो.

खऱ्या नैतिकतेचे घटक सदैव शाश्वत असतात. ते स्थल आणि कालाप्रमाणे बदलत नसतात. त्या घटकांचा गाभासुध्दा सदैव शास्वत असतो. तो पंडितांच्या चर्चा किंवा न्यायालयीन शब्दच्छल बदलू शकत नाही. प्रामाणिकता, शील, शुध्दता, त्याग, सेवा आणि साधी राहणी व सत्यता हे नैतिकतेचे प्रमुख घटक आहेत व प्रत्येकाची स्वतंत्र्य वैशिष्ठ्ये आहेत. प्रामाणिक मनुष्य प्रकाश किंवा शस्त्र यांना कधीही घाबरत नाही. चारित्रवानाचे चारित्र्य हनन करणे हे समुद्र कोरडा करण्याइतकेच अशक्य आहे. निर्मल आणि धवल चरित्र हाच कीर्तीचा पाया असतो. जेव्हा एकादा सूर्यावर थुंकण्याचे धाडस करतो तेव्हा स्वत:वरच थुंकतो. सूर्याला थुंकण्याविरुध्दच्या कायद्याच्या संरक्षणाची जरूरी भासत नाही. तसेच चरित्रवान माणसाला अपाकीर्तिविरुध्द कायद्याची जरुरी नसते. शीलसंपन्न नागरिक हे देशाचे सर्वात मोठे भूषण असते. कबीर म्हणतात की ,ज्या समाजात शूर, विद्वान, धार्मिक आणि धनिक माणसापेक्षा शीलसंपन्न माणसांची संख्या अधिक असते तो सर्वश्रेष्ठ आणि सर्वोत्तम समाज होय. आचारशुध्दता नीतिमान माणसाचे जीवन शुध्द करते व त्याचे व्यक्तिमत्व प्रसन्न, शांत व लोभस असते.

स्वसंरक्षण हे प्राणीजातीचे सर्वश्रेष्ठ ध्येय-आणि म्हणनच स्वत:च्या प्राणाची आहुती ही त्यागाची सर्वश्रेष्ठ कसोटी असते. इ. स. १८५७ ते १९४७ या काळात अनेकांनी भारतात असे महनीय त्याग केले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात हे महान त्यागी नभात चमकणाऱ्या ताऱ्यांप्रमाणे आहेत. त्यांनी असा त्याग केला नसता तर भारत कधीही स्वतंत्र झाला नसता. सेवा म्हणजे दारिद्र्य निर्मूलन हे जागतिक समीकरण आहे. महात्मा गांधी म्हणत की ''अत्यंत दरिद्री आणि अशक्त माणसाचा चेहरा डोळ्यापुढे आणा व तुम्ही जे करू इच्छिता किंवा करता त्याचा त्याला काही फायदा होईल काय? त्यातून त्याला काही मिळेल काय? याचा विचार करा.'' ज्या प्रमाणे कृत्रिम प्रसाधनांमुळे नैसर्गिक सौंदर्य नष्ट होते त्याच प्रमाणे चैन आणि डामडौल ही नीतिमत्तेची हानी करतात. अत्यंत साधी राहणी आणि उच्च करणी हे नीतिमान माणसाचे विशेष गुण आहेत. सत्य म्हणजे काय? कांहीजण सत्य हाच परमेश्वर म्हणतात तर काहीजण सत्य म्हणजे ज्ञान म्हणतात. सत्य म्हणजे सर्वोदय असे नीतिमत्ता सांगते. ज्या समाजामध्ये अल्पसंख्य सर्व चांगल्या वस्तूंचा उपयोग घेतात. व बहुसंख्य अन्न, वस्त्र व निवाऱ्याकरिता दाही दिशांना भटकतात, ज्या समाजात चारित्रहीन प्रतिष्ठित नागरिक होतात, ज्या समाजात कावळे मोती चुरतात आणि हंस दाणे टिपतात तो अत्यंत अनीतिमान समाज असतो. आपल्या भारतीय समाजाचे नैतिक अध:पतन हे कटु सत्य आहे. ह्या अध:पतनाचे बीज राजकारणात आहे.

नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरील राजकारणाचा प्रभाव गांधीजींनी अतिशय मार्मिकतेने विशद केला आहे. ते म्हणतात ''सापाच्या विळख्याप्रमाणे राजकारण आपल्याला वेढते व त्यातून सुटका होणे मुष्किल आहे'' राजकारणाच्या अनेकांनी अनेक व्याख्या केल्या आहेत. पण कुठलीही व्याख्या राजकारणी लोकांचा गौरव करत नाहीत. असे का? राजकारण म्हणजे सत्तेसाठी संघर्ष. कोणाला काय मिळते आणि कशाकरता मिळते हे त्याच्या सामर्थ्य, गुण आणि कार्य यावरून ठरत नसून राजकर्त्यांच्या लहरीनुसार ठरते. राजकर्त्यांची कृपा झाली तर स्वयंपाकी मंत्री होतो आणि अवकृपा झाली तर महाज्ञानी महामूर्ख गणला जातो. क्यामे अंकुमा घाना मध्ये सत्तेवर असताना त्यांनी स्वत:चाच पुतळा उभारला होता व त्याच्याखाली लोकांना संदेश होता की ''प्रथम राजसत्ता काबीज करा मग सर्व तुमच्याकडे आपोआप चालत येईल'' खास सवलती, अवांतर प्राप्ती आणि अगणिक- संपत्ती फक्त राजकारण्यांसाठी असतात. त्यामुळे पुरुष आणि स्त्रिया, तरुण आणि वृध्द, पंडित ,णि मूर्ख राजकारणात घुटमळतात. स्वतः राजकारणी लोक राजकारणाचे 'जे लाभदायक ते प्राप्त करण्याची कला'' असे वर्णन करतात. त्यामुळे हीन संधिसाधू हेच उत्कृष्ट राजकारणी ठरतात.

आप:स्वार्थ हाच राजकारणाचा ध्रुवतारा आहे. पण राजकारणी लोकात हे कबुल करण्याचे मनोधैर्य नाही. त्यामुळे ते दांभिक बनतात.

राजकारणी सत्तास्थाने बळकावतात तेव्हा ती आपल्या जनतेची सेवा करण्यासाठीच घेतली आहेत असे सांगतात. ''सार्वजनिक हिताच्या'' नावाखाली राजकारणी ''स्वहित'' साधत असतो. ''राष्ट्रनिर्मितीच्या'' नावाखाली तो ''कौटुंबिक संपत्ती' जमा करतो. अशा प्रकारे प्रत्येक देशांमध्ये कुंपणच शेत खाते. भारतात राजकारणी

दोन्ही हात जोडून व नतमस्तक होऊन जनतेला पध्दतशीरपणे लुबाडत असतात. धर्मगुरु प्रमाणे राजकारणी सुध्दा जनतेला प्रवचने देतात. पण धर्मगुरु प्रमाणेच ती प्रवचने त्यांच्यासाठी वा त्यांच्या कुटुंबियासाठी नसतात.

आमचे एक प्रख्यात पुढारी नेहमी जनतेला उपदेश करीत की ''आराम हराम है'' पण ते स्वत:, त्यांचे कुटुंबीय, त्यांचे नातलग आणि त्यांचे खुषमस्करे सार्वजनिक पैशांवर अत्यंत चैनी आणि विलासी जीवन जगले. राजकारणी आपला सर्व वेळ व शक्ती आपण जनतेच्या सेवेसाठी खर्च करतो असा दावा करतात. त्यामुळे ते कोट्यावधी रुपयांची संपत्ती केव्हा, कधी व कशी जमा करतात हे एक कोडेंच आहे. जनतेचा उत्कर्ष व भरभराट हेच आपल्या जीवनाचे मुख्य ध्येय आहे असे राजकारणी घोषित करतात. पण त्यांच्या मृत्युपत्रात मात्र सर्व संपत्ती फक्त त्यांच्या मुलांना व मुलांच्या मुलांना व त्यांच्या अस्थीचे राष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सार्वजनिक खर्चातून विसर्जन करण्याची हमखास तरतूद असते. कांही धूर्त आपली निवासस्थाने राष्ट्राला अर्पण करतात पण अर्पण पत्रिकेतील मेख अशी असते की निवास स्थानाच्या देखभालीचा आणि डागडुजीचा सर्व खर्च सार्वजनिक पैशातून चालतो व त्यात कायम रहाण्याचा कायदेशीर हक्क फक्त त्यांच्या मुलांनाच दिलेला असतो.

सिझरच्या पत्नीप्रमाणे सार्वजनिक जीवन संशयातीत असले पाहिजे. जगातील सर्व देशांतील सार्वजनिक जीवन अतिशय संशयास्पद आहे. राष्ट्रातील सर्वोच्च राजकीय पदावर असलेले लोक धादांत खोटे बोलण्याची अनेक उदाहरणे आहेत. ह्यामुळे जितके सत्तास्थान उच्च तितकेच त्याच्या धारकाच्या शीलाची पातळी नीच असा राजकीय सिध्दांतच बनलेला आहे. प्राचीन काळी ग्रीक तत्ववेत्ता डायोजेनीस भर दिवसा उजेडी हातात कंदिल घेऊन प्रामाणिक माणसाचा शोध घेत असे. त्यानंतर विज्ञानाने अभूतपूर्व प्रगती केलेली आहे. पण प्रामाणिकतेच्या शोधाच्या संदर्भात ती कुचकामी ठरलेली आहे. म्हणून न्यायालयीन प्रशस्ती पत्रे ही प्रामाणिकतेचा अंतिम पुरावा म्हणून समाजाने स्वीकारावीत असा राजकारणी लोकांचा आग्रह असतो. नीतिवादी हा युक्तिवाद फेटाळून लावतात कारण जे कायदेशीरदृष्ट्या प्रामाणिक ठरते ते प्रत्यक्षात अप्रामाणिक असते असा समाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे.

आज भारतात ढोंगीपणाने कळस गाठला आहे. ज्यांच्या बलिदानामुळे आज फालतू लोक राजकर्ते झाले, ज्यांनी ऐन तारुण्यात देशाकरता मृत्यूला कवटाळले त्या विभूतींच्या अपूर्व त्यागाची बुध्दिपुरस्पर उपेक्षा केली जात आहे आणि ज्या पुढाऱ्यांनी स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर देशभक्तीचे भांडवल करून आपल्या कुटुंबियांचे लोककल्याण करून ठेवले त्यांचा महान देशभक्त आणि महान त्यागी म्हणून प्रचार चालविला आहे. भारतासारख्या गरीब राष्ट्राचा पैसा अशा पुढाऱ्यांच्या शताब्दिमहोत्सवात आणि समाधी आणि पुतळे उभारण्यात खर्च केला जात आहे. राष्ट्राची प्रचार माध्यमे त्यांच्या तथाकथित त्यागाची व सेवेची गौरव गाथा गावात वापरली जात आहेत. स्वर्गीय राम मनोहर लोहिया एकदा म्हणाले,की, भविष्यात दिल्ली ही थडग्यांची राजधानी म्हणून जगात ओळखली जाईल. आज देशांत मुलांना शाळा नाहीत, रोग्यांना रुग्णालये नाहीत. पण चांगल्या चांगल्या सार्वजनिक इमारतीचे काही दिवंगत पुढाऱ्यांच्या स्मृतीचे अवशेष सांभाळण्यासाठी म्युझीयमस केले आहेत. तथापी अब्राहम लिंकनने सांगितल्याप्रमाणे कोणीही लोकांना सदासर्वकाळ फसवू शकत नाही.

स्वतंत्र भारतात राजकारणी लोकांची प्रतिमा एकसारखी खाली घसरत चालली आहे. ''सत्यमेव जयते'' हे ज्या देशाचे ब्रिद वाक्य आहे त्या देशांत पावलोपावली सत्याचा खून पडताना दिसत आहे. सार्वजनिक चौकशीतून काही विशिष्ट अधिकाऱ्यांना वगळण्याची भारतीय घटनेतील तरतूद व गोपनीय कायदा ही भ्रष्टाचाराची कवचकुंडले झाली आहेत. असे सांगतात की उघडकीला आलेल्या प्रत्येक लफड्यांमागे दहा लफडी दडून असतात. त्यामुळे कुठलाही राजकारणी भ्रष्टाचार आणि लफडी यापासून मुक्त आहे यावर भारतीय लोकांचा जरासुध्दा विश्वास बसत नाही. जेव्हा काळोखांतील लज्जास्पद कृत्ये प्रकाशात येतात तेव्हा संबंधित राजकारणी दुसऱ्या राजकारण्याच्या तसल्याच कृत्याकडे लक्ष वेधून स्वत:चे समर्थन करतो. असल्या आरोप आणि प्रत्यारोपांनी भारतीय राजकारण आणि सार्वजनिक जीवन दुर्गंधीमय झाले आहे.

स्वतंत्र्य भारताने पाश्चात्य लोकशाही पध्दतीचा स्वीकार करण्यात मोठी घोडचूक केली. पाश्चात्य लोकशाही मूलतः ''बाजारी लोकशाही'' आहे. बाजारी लोकशाही म्हणजे बाजार भावाचे राज्य आणि भावाधिष्ठित राजकारण असल्या लोकशाहीत लोकांची खरेदी आणि विक्री स्वाभाविक आणि अपरिहार्य असते. फक्त महात्मा गांधीनी पाश्चिमात्य लोकशाहीचे खरे स्वरुप ओळखले होते. पण भारताने तिचा स्वीकार करू नये हे लोकांना पटवून देण्यात गांधीजी अयशस्वी झाले. चाळीस वर्षांची बेबंदशाही आपणांस शिकविते की मूल्याधिष्ठित राजकारणाशिवाय भारताला पर्याय नाही. नैतिकता हाच उत्तम समाजाचा खरा पाया आहे. गांधीजींनी ओळखल्या प्रमाणे नैतिकतेशिवाय राजकारण म्हणजे घाणीने भरलेली दलदल.''

मुल्याधिष्ठित राजकारणासाठी भारतीयांना तीन तरतुदी कराव्या लागतील. त्या अशा (१) सर्व राज्यकर्त्यांवर जनतेचे कठोर नियंत्रण पंतप्रधानापासून पंचायत तलाठ्यापर्यंत सर्वांना त्यांच्या कारभाराचा जनतेला जाब देण्याची सक्ती, (२) भारतातील प्रत्येक संस्था व कार्यालय यांच्या कारभारासंबंधीची सर्व कागदपत्रे जनतेला थेट, सुलभ आणि मुक्तपणे मिळणे. सार्वजनिक संपत्तीचा अपहार गुप्ततेमुळे होतो. (३) प्रत्येक माणसाची संपत्ती आणि ती मिळविण्याचे मार्ग हे जाहीर केले पाहिजेत व सदैव सार्वजनिक चौकशीसाठी उपलब्ध केले पाहिजेत. ह्या तरतुदींशिवाय लोकसभा ते पंचायतीपर्यंत सर्व संस्था म्हणजे लोकशाहीचे शुध्द विडंबन आहे. लोकशाही सार्वजनिक क्षेत्रातील सर्व माहिती जाणण्याचा हक्क नागरिकांना नाकारते ती लोकशाही म्हणजे एक थोतांड आहे ''सार्वजनिक हित'' हे फक्त राजकारणी आणि त्यांचे नोकरशाहीतील व इतर क्षेत्रातील बगलबच्चे व खुषमस्करे यांनाच कळते असे जेव्हा लोक समजतात तेव्हा ते आपले अपरिमित नुकसान करून घेतात. जनतेची सत्ता ही गरीबी हटाव प्रमाणेच एक पोकळ घोषणा आहे. एकाद्या संस्थेला सत्ता बहाल केल्यावर लोकांना सत्ता मिळते हा फार चुकीचा समज आहे. प्रतिनिधी सरकार मध्ये तर हे मुळीच खरे नसते कारण आज लोकांचे प्रतिनिधीच लोकांना लुबाडतात ही वास्तवता आहे. लोकांना सत्ता मिळाली ह्याचा पुरावा काय ? जेव्हा लोकांना आपले प्रतिनिधी, राजकर्ते, शासकीय आणि न्यायालयीन अधिकाऱ्यांना त्यांच्या कामगिरीबद्दल जाब विचारण्याचा व त्यांना त्याबद्दल बक्षीस किंवा शिक्षा करण्याचा अधिकार असेल तेव्हाच जनतेच्या हातात खरी सत्ता येईल. या अधिकाराशिवाय लोकशाही म्हणजे शुध्द फसवणूक होय.

प्राचीन भारतीयांच्या कर्तृत्वाने प्रभावित होऊन स्वामी विवेकानंद म्हणाले होते की, भारताने जगाला नीतिमत्तेचे पाठ द्यावे अशी नियतीची इच्छा आहे. भारताला स्वराज्याची जरूरी या पवित्र कार्यासाठी भासत होती. नैतिक दिवाळखोरी हा स्वराज्याचा दैवदुर्विलास आहे. नीतिमत्तेच्याबाबतीत प्राचीन भारत आणि आजचा भारत यातला फरक म्हणजे अति उदात्त आणि अति क्षुद्र यांच्यामधील फरक आहे. मूल्याधिष्ठित राजकारणानेच भारत गमावलेली अस्मिता परत मिळवू शकेल.